# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## कृषि नगर, अकोला - ४४४१०४ (महाराष्ट्र)

दुरध्वनी क्र.: ०७२४-२२५८३७२
ई-मेल : registrar@pdkv.ac.in


**महत्त्वाचे**

जा.क्र.बीएमसी/प्रकल्पग्रस्त/पदभरती २०२५/२०२६/2192
दिनांक : २६ ऑगस्ट, २०२६.

प्रति,

**सर्व संबंधित कार्यालय प्रमुख**
**डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला**

विषय :- **प्रकल्पग्रस्त विशेष पदभरती अंतर्गत नियुक्ती मिळालेल्या कर्मचा-यांचे पुनर्वसन दाखले व बंधपत्र मागविणेबाबत..**

शासन निर्णय क्रमांक कृषिवि-३७२३/प्र.क्र.१६९/६-अे, दिनांक १४ ऑक्टोंबर, २०२४ अन्वये विद्यापीठ प्रकल्पग्रस्त विशेष पदभरती माहिमेअंतर्गत दिनांक २५ फेब्रुवारी, २०२५ व दिनांक २७ फेब्रुवारी, २०२५ (२) रोजी गट-क व गट-ड संवर्गाच्या जाहिरांती प्रसिध्द करण्यात येवून एकुण ६८० पदांची पदभरती प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

त्यानुसार गट-क सवंर्गाचे विद्यापीठ नियुक्ती आदेश दिनांक २४.०७.२०२६ रोजी व गट-ड सवंर्गाचे विद्यापीठ नियुक्ती आदेश दिनांक ०८.०८.२०२६ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. सदर विद्यापीठ नियुक्ती आदेशामध्ये नमुद अटी व शर्ती मध्ये उपजिल्हाधिकारी, पुनर्वसन जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांचे दिनांक २९.०६.२०२६ च्या पत्रानुसार निवड होणा-या उमेदवारांसंदर्भात **'एका कुटूंबात एक लाभ'** या तत्वाचे पालन करणे आवश्यक आहे. त्यानुसार निवड झालेल्या उमेदवाराला उपरोक्त बाबींकरीता तसेच सादर केलेले ईतर दस्तऐवज खोटे आढळल्यास सेवा संपुष्टीबाबतचे बंधपत्र रू.५००/- चे मुद्रांकपत्रावर विहित प्रपत्र-१ नुसार नोटरीकृत दस्तऐवज करुन सादर करणे बंधनकारक आहे. सदर बंधपत्रात सादर केलेली माहिती खोटी आढळल्यास दिलेली नियुक्ती कुठलीही पुर्वसुचना न देता संपुष्टात आणण्यात येईल. तसेच सदर प्रपत्र-१ मधील बंधपत्र घेवून रूजू अहवालासोबत या कार्यालयास पाठविण्याची जबाबदारी संबंधीत कार्यालय प्रमुखांची राहील असे नमुद केले आहे.

याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या कार्यालयाचे अधिनस्त नियुक्त झालेल्या प्रकल्पग्रस्त कर्मचा-यांचा रूजू अहवाल, बंधपत्र व पुनर्वसन दाखला यांची मुळ प्रत घेवून संबंधित काम पाहणारे कर्मचारी यांना **दिनांक ३१.०८.२०२६ रोजी** कुलसचिव यांचे दालनात व्यक्तीशः हजर राहणेबाबत सुचित करावे. तसेच ज्या कार्यालय प्रमुखांनी उपरोक्त दस्तऐवज यापूर्वी या कार्यालयास सादर केले असतील त्यांनी वरील दिनांकास उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

(प्रिती रोडगे)
कुलसचिव,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

प्रतिलीपी :

१) प्रभारी अधिकारी, कृषि माहिती प्रणाली कक्ष (ARIS), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांनी सदरचे पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करणेकरीता अग्रेषित.
२) कुलगुरू यांचे स्वीय सहायक यांना मा. कुलगुरू महोदय यांच्या माहितीकरीता सादर.